MHGO040009642023

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आमगांव यांच्या न्यायालयात, ता. आमगांव.**

(पिठासीन अधिकारी श्री ए. आर. जोशी)

**[न्यायनिर्णय दि.०६/०५/२०२६]**

**सं.फौ.ख.क्र. ४८९/२०२३**

**कालावधीःव.०२,म.०८,दि.०८.** **नि. क्र. १६**

( गुन्हा क्र. २७३/२०२३, पोलीस स्टेशन, सालेकसा )

| | | |
|---|---|---|
| **अभियोगपक्ष** | | **महाराष्ट्र सरकारतर्फे**<br>पोलीस स्टेशन, सालेकसा,<br>ता. सालेकसा, जि. गोंदिया. |
| **सहा. सरकारी वकील** | | **विधिज्ञ श्री एम. के. बोरीकर.** |
| **आरोपी** | | **भुमेश्वर बारकु शहारे,**<br>वयः ४७ वर्षे,व्यवसाय – मजूरी,<br>रा.  आमगांव खुर्द, सुभाष चौक जवळ,<br>ता. सालेकसा जि. गोंदिया. |
| **आरोपींतर्फे वकील** | | **विधिज्ञ श्री एन.वाय शेख.** |

| | |
|---|---|
| **घटना घडल्याचा दिनांक** | दि.०५.०८.२०२३. |
| **प्रथम खबर अहवाल दिनांक** | दि.०५.०८.२०२३. |
| **फिर्यादची तारीख** | दि.०५.०८.२०२३. |
| **दोषारोपपत्र दाखल झाल्याची तारीख** | दि.२६.०८.२०२३. |
| **फिर्याद दाखल तारीख** | दि.२९.०८.२०२३. |
| **आरोपीवर दोषारोप ठेवल्याची तारीख** | दि.३१.०७.२०२५. |
| **पुरावा सुरू झाल्याची तारीख** | दि.०५.०२.२०२६. |
| **न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख** | -- |
| **न्यायनिर्णय तारीख** | दि ०६.०५.२०२६. |
| **आरोपीला शिक्षा सुनावल्याची तारीख** | -- |

**आरोपीची माहिती**

| | |
|---|---|
| **आरोपीचे नाव** | भुमेश्वर बारकु शहारे, |
| **अटकेची तारीख** | -- |
| **आरोपीला जामिनावर सोडल्याची तारीख** | दि. २९.०८.२०२३. |
| **दोषारोप** | म. जु. का. कलम १२ (अ) प्रमाणे. |
| **शिक्षा देण्यात आली कि निर्दोष सोडण्यात आले** | निर्दोष सोडण्यात आले. |
| **देण्यात आलेली शिक्षा** | -- |
| **आरोपी केस दरम्यान किती दिवस तुरूंगात होता** | -- |

**साक्षीदारांची यादी / बचावपक्ष / कोर्ट साक्षीदार**

**अ) अभियोगपक्ष :**

| **सा. क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **साक्षीदार कोणत्या प्रकारातील आहे. (प्रत्यक्षदर्शी, पोलिस, वैद्यकिय अधिकारी, पंच)** |
|---|---|---|
| अ.सा.१ | भुपेश प्रकाश मेहर, | पंच साक्षदार (नि. क्र. ०७ ) |
| अ.सा.२ | संजय आर. चौबे, | फिर्यादी (नि. क्र. ०८ ) |

**ब) बचावपक्ष :**

| **सा. क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **साक्षीदार कोणत्या प्रकारातील आहे. (प्रत्यक्षदर्शी, पोलिस, वैद्यकिय अधिकारी, पंच, इतर)** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क) कोर्ट साक्षीदार:**

| **साक्षीदाराचे नाव** | **साक्षीदाराचे नाव** | **साक्षीदार कोणत्या प्रकारातील आहे. (प्रत्यक्षदर्शी, पोलिस, वैद्यकिय अधिकारी, पंच, इतर)** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**अभियोगपक्ष/ बचावपक्ष/ कोर्ट निशाणी क्र.**

**अ) अभियोगपक्ष**

| **अ.क्र.** | **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| **०१** | **०९** | **जप्ती पंचनामा** |
| **०२** | **१०** | **फिर्याद** |
| **०३** | **११** | **छापील फिर्याद** |

**ब) बचावपक्ष**

| **क्र.** | **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क) कोर्ट**

| **क्र.** | **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**ड) मुद्देमाल**

| **क्र.** | **मुद्देमाल क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**:: न्या य नि र्ण य ::**

**(दिनांक ०६ मे २०२६ रोजी घोषित)**

प्रस्तुतचा खटला महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) अन्वये आरोपीविरुध्द दाखल करण्यात आला आहे.

अभियोगपक्षाचे वतीने मांडण्यात आलेली वस्तुस्थीती खालील प्रमाणे;

२. फिर्यादी स. फौ. संजय रामप्रवेश चौबे, यांनी अशी फिर्याद दिली आहे की, दिनांक ०५.०८.२०२३ रोजी १६:३० ते १७:०० वाजताच्या दरम्यान मौजा सुभाष चौक, सालेकसा ता. सालेकसा जि. गोंदिया येथे आरोपी भुमेश्वर बारकु शहारे हा स्वतःच्या फायदासाठी सार्वजनीक ठिकाणी वरली मटक्याचे आकडे कोऱ्या कागदावर लिहुन लोंकाकडुन पैसे घेवुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळवितांना मिळून आले म्हणुन फिर्यादीने आरोपीविरुद्ध सालेकसा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

३. सदर फिर्यादवरुन सालेकसा पोलीस स्टेशन गु.र.क्र. २७३/२०२३ महाराष्ट्र

जुगार कायदा कलम १२ (अ) अन्वये आरोपीविरुध्द दाखल करण्यात आला व गुन्ह्याचा तपासकाम पो. ना. राजेशकुमार तुरकर यांच्याकडे देण्यात आला. तपासादरम्यान त्यांनी लेखी रिपोर्ट, सट्टा पट्टी आकडे लिहलेली चिठ्ठी, साक्षीदारांची तपासटिपणे नोंदविली व तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. या न्यायालयाने आरोपपत्रावरुन दखल घेवून, आरोपीविरुध्द महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) अन्वये आरोपाचा सारांश नि. क्र. ०५ प्रमाणे निश्चित करण्यात आला. आरोपीने निवेदनाद्वारे आरोपाचा सारांश मान्य नसल्याचे कळविले व संपरीक्षेची मागणी केली.

५. अभियोगपक्षाने खटल्याच्या पुष्ट्यर्थ एकूण चार साक्षीदार तपासले आहे. पंच सा. क्र. १ भुपेश प्रकाश मेहर यास नि. क्र. ०७ वर आणि फिर्यादी सा. क्र. २ संजय आर. चौबे यास नि. क्र. ०८ वर साक्ष नोंदवली. अभियोगपक्षाने नि. क्र. १२ वर पुर्शिस दाखल करुन, त्यांचा साक्षीपुरावा बंद केला.

६. अभियोगपक्षाचा पुरावा बंद केल्यानंतर, आरोपीचे फौजदारी प्रक्रीया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये नि. क्र. १३ वर निवेदन नोंदविण्यात आले. आरोपीने त्याच्या निवेदनातील प्रश्नांना दिलेल्या उत्तरावरुन तसेच आरोपीच्या विद्वान वकीलांनी, अभियोगपक्षाच्या साक्षीदारांस विचारलेल्या प्रश्नांवरुन त्याच्याविरुध्द खोटा खटला दाखल करण्यात आल्याचा, त्याचा बचाव असल्याचे दिसून येते.

७. अभियोगपक्षाचे व आरोपीच्या वतीने त्यांचे विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला व न्यायपटावरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता माझेपुढे खालील मुद्दे उपस्थीत होतात ते निष्कर्षासह खालीलप्रमाणे दिले आहेत.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्ष हे सिद्ध करतो काय की, दिनांक ०५.०८.२०२३ रोजी १६:३० ते १७:०० वाजताच्या दरम्यान मौजा सुभाष चौक, सालेकसा ता. सालेकसा जि. गोंदिया येथे आरोपी भुमेश्वर बारकु शहारे हे स्वतःच्या फायदासाठी सार्वजनीक ठिकाणी वरली मटक्याचे आकडे कोऱ्या कागदावर लिहुन लोंकाकडुन | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| | पैसे घेवुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळवितांना आढळून आले काय ? | |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**– <u>का र ण मि मां सा</u> –**

**<u>साक्षीपुरावाः–</u>**

८. सदर खटल्यात पंच सा. क्र. १ भुपेश प्रकाश मेहर यांनी अभियोगपक्षास अनुकूल साक्ष दिली नसल्याने सरकारी वकिलांनी भारतीय पुरावा कायदा कलम १५४ अन्वये उलटतपासात प्रश्न विचारले. मात्र त्यामध्ये कोणतीही बाब अभियोगपक्षाच्या कामी आली नाही.

९. फिर्यादी सा. क्र. २ संजय आर. चौबे यांनी त्याच्या सरतपासात असे कथन केले आहे की, घटना दिनांक ०५.०८.२०२३ रोजी त्यांना गुन्हाची गुप्त माहिती मिळाली होती. त्या माहितीप्रमाणे घटनास्थळी जावून पाहणी केली असता तिथे काही लोक जुगाराचा खेळ खेडतांना मिळूण आले. त्याची अंग झडती घेतली असता सट्टापट्टीचा आकडे लिहिलेला कागद, निळ्या शाईचा डॉट पेन व सॅमसंग मोबाईल जप्त करण्यात आला. त्यानंतर जप्ती पंचनामा तयार करण्यात आला. सदर जप्ती पंचनामा नि. क्र. ०९ वर आहे. त्यावर त्यांची सही आहे व त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदरचा पंचनामा पोलिस उपनिरीक्षक पाटील यांनी तयार केला होता. त्यानंतर त्यांनी घटनेची फिर्याद दिली. सदर फिर्याद नि. क्र. १० वर आहे व छापील फिर्याद नि. क्र. ११ वर आहे. त्यावर त्यांची सही आहे व त्यातील मजकूर खरा व बरोबर असल्याचे त्यांनी सांगितले.

१०. सदर साक्षीदाराचा आरोपीतर्फे सविस्तर उलटतपास घेण्यात आला. साक्षीदाराने आरोपीतर्फे विचारण्यांत आलेल्या सर्व प्रश्नांचे नकारार्थी उत्तरे दिले.

**<u>मुद्दा क्र. १ करिता:</u>**

११. एकंदरीत पुराव्याचा अवलोकन केले असता, असे दिसून येते की, पंच सा. क्र. १ भुपेश प्रकाश मेहर याने अभियोगपक्षास सहकार्य केले नाही. त्यामुळे जप्ती पंचनामा निसंशयरित्या सिद्ध झालेला नाही. याशिवाय अभियोगपक्षाने दाखल अधिकारी व तपासी अधिकारी यांची साक्ष नोंदविली नाही. तसेच फिर्यादी सा. क्र. २ संजय आर. चौबे यांनी फिर्याद जरी सिद्ध केले असले

तरी त्यांच्या पुराव्याला पुष्टी देणारा एकही स्वतंत्र साक्षदार अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेला नाही. त्यामुळे मात्र त्यांची साक्षवर अवलंबून राहून आरोपींना दोषी ठरता येत नाही. म्हणून आरोपी हा स्वतःच्या फायदासाठी सार्वजनीक ठिकाणी वरली मटक्याचे आकडे कोऱ्या कागदावर लिहुन लोंकाकडुन पैसे घेवुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळवितांना आढळून आले ही बाब अभियोगपक्षाने सबळ पुरावा अभावी सिद्ध केलेली नाही. अशा परिस्थितीत आरोपींना प्रस्तुत प्रकरणातून निर्दोष मुक्त करणे योग्य व संयुक्तिक होईल. परिणामी, मी मुद्दे क्र. १ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

**मुद्दा क्र.२ करिता:–**

१२. प्राप्त परिस्थिती व मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष लक्षात घेवून मुद्दा क्र. २ चा निष्कर्ष नोंदवण्याकरिता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. आरोपी **भुमेश्वर बारकु शहारे** यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५ (१) अन्वये, मुंबई जुगार कायदा कलम १२(अ) अंतर्गतच्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ४३७–अ अन्वयेची पुर्तता केली आहे.

३. जप्त मद्देमाल म्हणजे, नगदी रू. २१०/– अपील कालावधीनंतर सरकार जमा करण्यात यावे.

४. जप्त मुद्देमाल म्हणजे, एक पेन आणि सट्टापट्टी कागद मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावे.

५. जप्त मुद्देमाल म्हणजे, एक जुना वापरता सॅमसंग कंपनीचा किपॅड मोबाईल अपील कालावधीनंतर मुळ मालकास परत करण्यात यावे.

६. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by JOSHI ATUL RATNAKAR
Date: 2026.05.06 15:32:24 +0530

आमगाव. ( ए. आर. जोशी )
दिनांकः ०६.०५.२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आमगांव.